0 8 MAR 2026 जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या ७३८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून आजअखेर ७३८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

0 8 MAR 2026
सकाळ

# 'जीवन समृद्धतेचा जिज्ञासा मार्ग'

कोल्हापूर : "जीवन जगणे कला आहे. ती कला आत्मसात करा. त्यासाठी आयुष्यभर जिज्ञासू राहा. ही जिज्ञासा जेव्हा संपेल, तेव्हा माणूस म्हणून असणारे अर्धे अस्तित्व संपलेले असेल," असे मत डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज येथे महाविद्यालयाची संशोधन कमिटी, शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले अध्यक्षस्थानी होते. डॉ. कुंभार यांनी जिज्ञासा, शिक्षण, श्रमनिष्ठा आणि मानवी जीवनमान सुधारण्यासाठीचे विज्ञानाचे योगदान यावर मार्गदर्शन केले. डॉ. भोसले म्हणाले, "चांगले संशोधन समाजोन्नतीला मदत करणारे ठरेल." डॉ. यु. एस. शेळके, विज्ञानच्या उपप्राचार्या डॉ. पी. बी. पिस्टे, वाणिज्यच्या उपप्राचार्या डॉ. एम. बी. देसाई, कलाचे उपप्राचार्य डॉ. ए. पी. उबाळे, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. के. व्ही. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. श्यामल हुंबरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अर्चना पाटील यांनी आभार मानले.

0 8 MAR 2026
सकाळ

# प्रा. विपुल पाटील यांना पीएच.डी.


विपुल पाटील

रुकडी : माणगाव (ता. हातकणंगले) येथील प्रा. विपुल मलगोंडा पाटील यांनी 'डिझाईन, सिंथेसिस अॅन्ड बायॉलॉजिकल ईव्हॅल्युएशन ऑफ ऑक्साडायाझोल अॅन्ड पायराझोल डेरिव्हेटिव्हज' या विषयावर शिवाजी विद्यापीठ येथे पीएच.डी. पूर्ण केली. पाटील अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी, पेठवडगाव येथील फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभागात कार्यरत आहेत. त्यांना भारती विद्यापीठाचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना अशोकराव माने शिक्षण समूहाचे अध्यक्ष विजयसिंह माने, विश्वस्त मनीषा माने, प्राचार्य डॉ. ए. पी. गडद यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
0 8 MAR 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ, श्री स्पोर्टस् विजयी

## विलास यादव चषक टी-२० 'क' गट क्रिकेट स्पर्धा; अभिजित, मयूरची चमकदार कामगिरी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित विलास यादव (मेजर) चषक टी-२० 'क' गट क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने पॉप्युलर स्पोर्टस् 'अ' चा, श्री स्पोर्टस् असोसिएशनने वेद स्पोर्टस् 'ब'चा पराभव केला.

शासकीय तंत्रनिकेतन मैदानात पॉप्युलर स्पोर्टस् 'अ' व शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघात सामना रंगला. सामना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २५ धावांनी जिंकला. संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० षटकांत ९ बाद १५२ धावा केल्या. यात अभिजित कोठावळेने ५०, विशाल हिलगेने २५, विक्रम कोंडावळेने १८, योगेश दळवीने १६, सुखदेव पाटीलने १३ धावा केल्या. पॉप्युलर स्पोर्टस् कडून गोलंदाज प्रणव निगुंडकरने चार, योगेश



मयूर पाटील



अभिजित कोठावळे

चव्हाणने दोन, अजित अतिग्रे, निखिल हासुरे, राहुल वाले यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. उत्तरादाखल खेळताना पॉप्युलर संघाने २० षटकांत ९ बाद १२७ धावांपर्यंत मजल मारली. यात रोहित धुमाळने ४५ धावांची एकाकी झुंज दिली. अमित कांबलेने १६, वैभव मोडकने १४ आणि अजित अतिग्रेने १० धावा केल्या. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाकडून राज मुपडेने तीन, योगेश दळवी, सुखदेव पाटील यांनी प्रत्येकी दोन, दीपक कांबळेने एक बाद केला.

दुसऱ्या सामन्यात श्री स्पोर्टस् ने वेद स्पोर्टस् चा ५६ धावांनी पराभव केला. फलंदाजी करताना श्री स्पोर्ट्सने २० षटकांत ८ बाद १९७ धावा केल्या. मयूर पाटीलने ५५, आदित्य पाटीलने ३३, सूरज मानेने २७, विजय घारेने २५, वीर देसाईने २० धावा केल्या. वेद स्पोर्टस् कडून संकेत कौशिकने ३४ धावा केल्या. गोलंदाज आदित्य देवकर, अथर्व खवरेने प्रत्येकी एक गडी बाद केला. वेद स्पोर्टसला आव्हान पेलवले नाही. त्यांचा संघ २० षटकांत ८ बाद १४१ धावा केल्या. यात योगेश नाईकने ३५, अनिकेत नाईकने २३, सिद्धांत शिवुडकने २१, अथर्व दिवेकर, उत्तम पाटीलने नाबाद प्रत्येकी १२ धावा केल्या. 'श्री स्पोर्टस्'कडून रविराज कांबळेने दोन, वीर देसा, शर्वजित वारके, तुकाराम कोंढरे, सुनील चव्हाण यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. हा सामना श्री स्पोर्टस्ने ५६ धावांनी जिंकला.

जनसंपर्क कक्ष
0 8 MAR 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, श्री स्पोर्टस्‌ची आगेकूच

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ व श्री स्पोर्टस् असो. संघांनी प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून कै. विलास (मेजर) यादव चषक क गट टी २० क्रिकेट स्पर्धेत आगेकूच केली. जिल्हा क्रिकेट असो. आयोजित ही स्पर्धा शासकीय तंत्रनिकेतन कॉलेजच्या मैदानावर सुरू आहे

**कै. विलास (मेजर) यादव चषक क गट टी २० क्रिकेट स्पर्धा**




**अभिजित कोठावळे मयूर पाटील**

**शिवाजी विद्यापीठ संघाचा २५ धावांनी विजय**

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ९ बाद १५२ धावा केल्या. अभिजित कोठावळेने ५०, विशाल हिलगेने २५ धावा केल्या. पॉप्युलर स्पोर्टस अ कडून प्रणव निगुंडकरने ४, योगेश चव्हाणने २ विकेट घेतल्या. उत्तरादाखल पाप्युलर स्पोर्टस् अ संघ २० षटकांत ९ बाद १२७ धावांत गुंडळला. रोहित धुमाळने ४५ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठ संघाच्या राज मुपडेने ३, योगेश दवी व सुखदेव पाटील यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

**श्री स्पोर्टसचा ५६ धावांनी विजय**

श्री स्पोर्टस असोसिएशन अ संघाने २० षटकांत ८ बाद १९७ धावा केल्या. मयूर पाटीलने ५५, आदित्य पाटीलने ३३ धावा केल्या. वेद स्पोर्टस्‌कडून संकेत कौशिकने ३, अनिकेत जाधवने २ विकेट घेतल्या. उत्तरादाखल वेद स्पोर्टस् ब संघाने २० षटकांत ८ बाद १४१ धावा केल्या. योगेश नाईकने ३५ धावांची खेळी केली. श्री स्पोर्टस्‌कडून रविराज कांबळेने २ विकेट घेतल्या.

08 MAR 2026

पुढारी

# आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने उद्या विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने स्त्री अभ्यास केंद्र, लेडीज होस्टेल, बेटी बचाव अभियान, अंतर्गत तक्रार समिती, शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ९ मार्च रोजी 'राईटस, जस्टिस अँड अॅक्शन फॉर ऑल गर्ल्स अँड वुमेन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ ते दु. ३ या वेळेत ही कार्यशाळा होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. नॅकचे सल्लागार (बंगळूर) डॉ. जगन्नाथ पाटील यांचे बीजभाषण होणार आहे. यावेळी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



'महिलांचे हक्क, न्याय व कृती' ही यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या विषयावर डॉ. ज्योती शेटे (पुणे), प्रा. डॉ. प्रवीण पाटील कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा विनामूल्य असून कार्यशाळेच्या आधी राजर्षी सभागृहात नोंदणी करणे आवश्यक आहे. सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक प्रा. डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 MAR 2026 सकाळ

# विद्यापीठात २३, २४ ला जीएसटीवर चर्चा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठात २३ व २४ मार्चला 'जीएसटी रिफॉर्म्स, डिजिटायझेशन अँड इझ ऑफ डुईंग बिझनेस : मार्चिंग टुवर्डस विकसित भारत @२०४७' विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग व नवी दिल्लीतील भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेतर्फे चर्चासत्र होईल. केंद्रीय जीएसटी व केंद्रीय उत्पादक शुल्कचे प्रधान आयुक्त सुरेंद्र मानकोस्कर प्रमुख पाहुणे, तर कर्नाटकातील केंद्रीय विद्यापीठातील डॉ. व्ही. पांडुरंग बीजभाषक म्हणून उपस्थित राहतील. 'आयसीएआय'च्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य उमेश शर्मा, धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठातील डॉ. अंजू ताम्रगुंडी, नामदेव गवस (गोवा), सी.ए. आदित्य सोनटक्के (मुंबई) मार्गदर्शन करणार आहेत. जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन, व्यवसाय सुलभता आणि विकसित भारत@२०४७ या विषयांवर चर्चा होणार आहे.

08 MAR 2026

सकाळ

# महिला दिनानिमित्त उद्या विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने, स्त्री अभ्यास केंद्र, लेडिज हॉस्टेल, बेटी बचाओ अभियान, अंतर्गत तक्रार समिती, शारदाबाई पवार अध्यासन व शिक्षणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. ९) 'राईटस, जस्टिस, ॲण्ड ॲक्शन फॉर ऑल गर्ल्स ॲण्ड वुमेन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ ते ३ या वेळेत होईल. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांचे बीजभाषण होणार आहे. यावेळी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे मार्गदर्शन करणार आहेत.

0 8 MAR 2026

पुढारी

# लोकनेते देसाई अध्यासनातर्फे व्याख्यानाचे आयोजन

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या वतीने मंगळवारी (दि. १०) सायंकाळी सहा वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन (मिनी हॉल) येथे 'लोकनेते बाळासाहेब देसाई : एक दीपस्तंभ' या विषयावर व्याख्यान होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा येथील प्रा. डॉ. श्रीधर साळुंखे आहेत. अध्यक्षस्थानी डॉ. भरतभूषण माळी असणार आहेत.

08 MAR 2026
लोकमत




शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रा. अभिजित कांबळे यांनी निसर्गचित्रणाचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखविले.

# पोर्ट्रेट, लँडस्केप चित्रकलेविषयी शिवाजी विद्यापीठात प्रात्यक्षिके

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दोनदिवसीय चित्रकला कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत "पोर्ट्रेट, लँडस्केप अँड कॉम्पोझिशन" या विषयावर दळवीज आर्ट्स इन्स्टिट्यूटचे चित्रकार प्रा. अभिजित कांबळे यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेतील बारकावे प्रात्यक्षिकांसह समजावून सांगत मार्गदर्शन केले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे सभागृह आणि परिसरात कार्यशाळा झाली. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना पोर्ट्रेट, लँडस्केप, तसेच चित्ररचनेतील संतुलन, रंगसंगती आणि मांडणी याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रकारची चित्रे साकारली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या भिंतीवर चित्रकला पदविकेच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी साकारलेले भित्तीचित्र पाहून उपस्थित रसिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यासोबत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रांचे चित्रप्रदर्शनदेखील आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात पोर्ट्रेट, निसर्गचित्रे आणि विविध संकल्पनांवर आधारित चित्रांचा समावेश होता. विभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, बबन माने, विजय उपाध्ये यांनी समन्वयन केले. प्राचार्य अजेय दळवी, डॉ. मानसिंग टाकळे, चित्रकार विजय टिपुगडे, संग्राम भालकर, सुदर्शन वंडकर, गजानन वाघमारे उपस्थित होते.